# कट अँड कव्हरने स्टेशनचे बांधकाम

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा भुयारी मेट्रो ३ प्रकल्प बांधला जात असून, या मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या स्थानकाचे काम कट अँड कव्हर पद्धतीने करण्यात येत आहे.

मुंबईतल्या ऐतिहासिक वारसा स्थळांपैकी एक हा परिसर असून, येथील स्थानकांसह भुयारी मार्गाचे काम करताना कॉर्पोरेशने मोठया प्रमाणावर खबरदारी घेतली आहे.





कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा भुयारी मेट्रो मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या स्थानकाचे काम कट अँड कव्हर पद्धतीने करण्यात येत आहे.

## विमानतळ

१ दक्षिण मुंबईतून विमानळापर्यंत वेगाने पोहोचण्यासाठी मेट्रो ३ फायदेशीर ठरणार आहे.

## काय कनेक्ट होणार ?

२ मुंबई शहर आणि पश्चिम उपनगर या मेट्रो मार्गामुळे कनेक्ट होणार आहे.

## अप लाइन

३ वैतरणा २ या टनेल बोरिंग मशीनने येथील भुयारीकरणाचे काम करण्यात आले. ४.०७ किलोमीटर लांबीचे भुयार खणण्यात आले. यासाठी १ हजार ७४६ रिंग वापरण्यात आल्या. आझाद मैदान ते मुंबई सेंट्रल असे हे भुयार खणण्यात आले.

## डाऊन लाइन

४ वैतरणा १ या टनेल बोरिंग मशीनने येथील भुयारीकरणाचे काम करण्यात आले. ३.८१ किलोमीटर लांबीचे भुयार येथे खणण्यात आले. यासाठी २ हजार ७२० रिंग वापरण्यात आल्या. आझाद मैदान ते मुंबई सेंट्रल असे हे भुयार खणण्यात आले. २० महिन्यांत हे काम पूर्ण झाले.

## सुरक्षित आणि आरामदायी प्रवास

५ मुंबई महापालिकेच्या सब वेसोबत मेट्रो ३ ची कनेक्टिव्हिटी असणार असून, प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास प्रदान करणे हे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे उद्दिष्ट आहे.





## काय दावा?

६ स्थानकाचे काम ८३ टक्के झाले आहे. सरकत्या जिन्यांसह उर्वरित कामांचा यात समावेश आहे. जेव्हा केव्हा स्थानकाचे काम पूर्ण होईल आणि मेट्रो धावू लागेल तेव्हा सहा वेगवेगळ्या मार्गातून १ लाख ६८ हजार ८५० प्रवासी याचा लाभ घेतील, असा दावा केला जात आहे.